SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
Estd : 1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१-२६०९०९१

संदर्भ : संलग्नता/ टी-२/५०१६ दि. ११/०६/२०१८

प्रति,
मा.प्राचार्य,
**सर्व संलग्न पारंपारिक (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालये,**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - विद्यापीठाचा शैक्षणिक बृहत आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक असणारे सर्वेक्षण अग्रणी महाविद्यालयांकडून नियमित/एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांमार्फत करून घेणेबाबत.

महोदय/महोदया,

शासन निर्देशानुसार सर्व अकृषी विद्यापीठांचे सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीचे पंचवार्षिक बृहत आराखडे नव्याने तयार करावयाचे आहेत. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाचाही सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करावयाचा आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०७(६) नुसार सदरचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठाने स्थानिक उद्योगांसाठी आवश्यक असलेली कौशल्य पध्दती, व्यापार व वाणिज्य यासंबंधात महिला, विद्यार्थी, मागासवर्ग, आदिवासी जमाती व त्यांच्याशी संबंधित अन्य घटक यांसारख्या सामाजिक व आर्थिक दृष्टया वंचित असलेल्या युवकांच्या प्रादेशिक गरजा आणि त्याबाबतच्या युवकांच्या आकांक्षा यासाठी उच्च शिक्षणाच्या सुविधांच्या आवश्यक बाबींसंबंधात विद्यापीठाच्या भौगोलिक अधिकारीता क्षेत्रात पध्दतशीर क्षेत्रीय सर्वेक्षण करावयाचे आहे. सदरचे सर्वेक्षण विद्यापीठाशी संलग्नीत पारंपारिक (बिगर व्यावसायिक) महाविद्यालयांच्या नियमित/एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांमार्फत करणेचे आहे.

सदरचे सर्वेक्षण करण्यासाठी मोबाईल ॲप/विद्यापीठ संकेतस्थळावर वेबलिंक विकसित केली असून सदर ॲप/वेबलिंकची माहिती देण्यासाठी पारंपारिक प्रमुख अग्रणी महाविद्यालयांतील अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयकांसाठी दि.११/०६/२०१८ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यानंतर या प्रमुख अग्रणी महाविद्यालयांच्या क्लस्टरमध्ये अंतर्भाव असणा-या सर्व संलग्नित महाविद्यालयामधील अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयक, एन.एस.एस. समन्वयक तसेच सदर सर्वेक्षण करणारे किमान दोन होतकरु विद्यार्थी यांचेकरीता प्रत्येक प्रमुख अग्रणी महाविद्यालयांच्या समन्वयकांमार्फत उद्या दि. १२/०६/२०१८ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

सदरचे मार्गदर्शन प्राप्त झालेनंतर सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमार्फत दि. १३/०६/२०१८ ते १८/०६/२०१८ या कालावधीमध्ये सर्वेक्षण पूर्ण करणेचे आहे. या सर्वेक्षणामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक... इत्यादी १२ विविध घटकांमार्फत प्रश्नावली मोबाईल ॲप, तसेच विद्यापीठ संकेतस्थळावरील वेबलिंकव्दारे भरुन घेण्याचे आहेत. सदर प्रश्नावली सिस्टीममध्ये यशस्वीपणे भरण्यासाठी सर्वेक्षण करणा-या विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत प्रती प्रश्नावलीकरीता रु. १०/- प्रमाणे रक्कम आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

तरी आपणांस आदेशान्वये कळविणेत येते की, **आपल्या महाविद्यालयातील अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयक, एन.एस.एस. समन्वयक व सर्वेक्षण करण्यासाठी किमान दोन होतकरु विद्यार्थी (शक्यतो एन.एस.एस. चे असावेत) यांना आपल्या संबंधीत प्रमुख अग्रणी महाविद्यालयामध्ये उद्या दि. १२/०६/२०१८ रोजी ठिक. १२.०० वाजता या मार्गदर्शन कार्यशाळेसाठी उपस्थित राहणेबाबत कळवावे.**

विद्यापीठाचा बृहत आराखडा तयार करणेसाठी सदरचे शास्त्रोक्त सर्वेक्षण हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतूद व शासनाने निर्देशित केल्यानुसार करावयाचे असलेने ही जबाबदारी विद्यापीठाची तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांची असल्याने याकरीता आपलेस्तरावर वरीलप्रमाणे अपेक्षीत असलेले सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव